पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०८

**सभावृत्तांत**

**दिनांक - १६/०२/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **१६/०२/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२.मा.अनुराधा गणपत गोरखे
३.मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
४.मा.संगिता(नानी) प्रभाकर ताम्हाणे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कोळप- प्रशासन अधिकारी, मा.रामगुडे- कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) रमाई आवास योजना राबविणेकामी जागा उपलब्ध करुन घेणेबाबत.- मा.अनुराधा गोरखे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २) कामकाजाचे बिल अदायगीबाबत.- मा.संगिता ताम्हाणे, मा.अनुराधा गोरखे, यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) सर्व घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये सोलर होम लाईट सेट बसविणेबाबत.-मा.अनुराधा गोरखे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०२/०२/२०२१ व ०३/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक –१२ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १६/०२/२०२१
सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर
संदर्भ – मा.अनुराधा गोरखे ,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

रमाई आवास योजना राबविणेसाठी महानगरपालिकेने पुढाकार घेवून शासन व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडे रमाई आवास योजना राबविणेसाठी जागेची मागणी करावी व ती जागा उपलब्ध होणेकरिता पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करावा. सदर जागा उपलब्ध करुन घेऊन रमाई आवास योजनेची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १६/०२/२०२१

सुचक : मा.संगिता ताम्हाणे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ : मा.संगिता ताम्हाणे, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे स्वस्त घरकुल योजना राबविण्यात आलेली असुन त्या कामकाजाबाबतचे बीले संबंधितांना अदा केली जातात. परंतु यापुढे बिले अदा करण्याअगोदर अदा करण्यात येणारे बिलांची माहिती मा.शहर सुधारणा समितीच्या सभेमध्ये सादर करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०३

दिनांक – १६/०२/२०२१

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ : मा.अनुराधा गोरखे,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टीवासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरीता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान व जीवनमान आरोग्यदृष्टया उत्तम राहणे ही महानगरपालिकेची पालक म्हणुन प्राथमिक जबाबदारी असलेने झोपडपट्टीवासियांच्या घरामध्ये सोलर होम लाईटचा (ग्रीन एनर्जी) पर्यावरणदृष्टया प्रवाह होणे गरजेचे असून महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण मार्फत तयार होणा-या विजेचा वापर कमी होईल तसेच त्यातुन निर्माण होणारा प्रदुषण वायू पासून म्हणजेच CO2 (कार्बन), Nox, Sox यापासून तेथील रहिवाशाचा बचाव होईल. घराच्या छपरावर सोलर पॅनेल उभारुन त्याव्दारे सोलर फोटो व्होल्टाइक पॅनेल व्दारे वीजनिर्मिती केली जाते. यामध्ये निर्माण झालेली वीज थेट महावितरणच्या जाळयाला (ग्रीड) ला जोडली जाऊ शकते. यातुन भारनियमन बंद होईलच शिवाय विजेचे मासिक बिल अत्यंत कमी प्रमाणात येईल. त्यासाठी प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना प्रत्येकी १ सोलर होम लाईट सेट म्हणजे २ टयुब लाईट, १ फॅन चालविण्यासाठी सोलर पॅनल तसेच बॅटरी बॅकअप, इनव्हरटर व १ पोल कार्यान्वीत करुन देण्यात यावा. सदरचे काम करणेसाठी Broadcast Engineering Consultants India Limited अथवा Savitiribai Phule Pune University या संस्थेस थेट पध्दतीने देण्यात यावे. सदरची खरेदी महानगरपालिकेच्या शहर सुधारणा विभागाअंतर्गत झोपडपट्टीमध्ये काम करणा-या विदयुत विभागामार्फत करण्यात यावी. तसेच शहर सुधारणा विभागा अंतर्गत येणा-या लेखाशिर्षावरील अ.क्र. १) महसुली – झोनिपु स्थापत्य विभाग किरकोळ दुरुस्ती व देखभाल पान क्र.९१७ ते ९४८, २) महसुली – विद्युत विभाग पान क्र.९४९ ते ९५३, ३) भांडवली- झोनिपु स्थापत्य पान क्र. ५९८ ते ६०२, ४) भांडवली - विदयुत विभाग पान क्र.६३२ ते ६३६ यावरुन खर्च करण्यात यावा. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी शहर सुधारणा विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात यावी. सदरचे साहित्य प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला तीन झोपडपट्टया शांतीनगर, विठ्ठलनगर, दत्तनगर या झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबाना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८०/२०२१
दिनांक : १६/०२/२०२१



**( उल्हास बबनराव जगताप )**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.